REGISTERED No. B. 3434

डोंगरे यांच्या बालामृताने अशक्त मुलें सशक्त होतात

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख २३ फेब्रुवारी, १९४९ अंक ८


## दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.

[औंध संस्थानांत स्थापन झालेली; सभासदांची जबाबदारी नियमित]

रजिस्टर्ड ऑफिसः—औन्ध

हेड ऑफिसः—१११।११२ सदाशिव पेठ, सातारा

शाखाः—औन्ध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेले भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ३,२३,८२० |
| वसूल भांडवल | रु. | १,६१,९१० |
| एकूण रिझर्व्ह | रु. | ८७,२५० |
| खेळतें भांडवल | रु. | १८,००,००० |

सर्व तऱ्हेचे बँकेचे व्यवहार केले जातात.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

[स्थापना १९१८]



टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | .... | रु. ४,१७,००० |
| रिझर्व्ह | ... | रु. २,५५,००० |
| ठेवी | ... | रु. ८५,००,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ९१,००,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

— विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा —

सब-ऑफिस : —दादर— (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

## ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडी, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तु, इत्यादिसाठीं चौकशी कराः—

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन लि.

९, वेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५११

### औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज् (लेः—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)

(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन (लेः—जे. बी. टेलर, किं. १ रु.)

(३) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन (लेः—आर. एम. तळपदे, किं. १२ आ.)

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**लेबर कमिशनरची नवी नोकरी**—श्री. एस्. सी. जोशी हे परवापर्यंत हिंदुस्थान सरकारचे लेबर कमिशनर होते. आतां श्री. जोशी हे ता. २० फेब्रुवारीपासून टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या नोकरींत मजूरविषयक प्रश्नांचे तज्ञ म्हणून आपल्या नवीन कामावर रुजू झाले आहेत, असें समजतें.

**हिंदुस्थानांतील सहकारी चळवळ**—"हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीला जनतेचा फारसा पाठिंबा मिळाला नाहीं. कारण, हिंदुस्थानांतील सरकार परकीय असल्यानें तें. सर्वच चळवळींकडे संशयी दृष्टीनें पहात असे." असे उद्गार श्री. व्ही. पी. वर्दे ह्यांनीं नुकतेच एका प्रसंगीं काढले. श्री. वर्दे हे गेल्या वर्षी प्रागला भरलेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी काँग्रेसच्या १७ व्या अधिवेशनाला हजर राहिले होते. युरोपमधील सहकारी चळवळीबद्दल त्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, ह्या चळवळीला लोकांचा आधार होता आणि चळवळींत सरकारचा हस्तक्षेप फारसा होत नसे. त्यामुळें युरोपांत सहकारी चळवळ चांगली फोफावली. हिंदुस्थानच्या राज्यघटनेंत सहकारी चळवळीला योग्य ती मान्यता देण्यांत यावी, असें मतहि त्यांनीं व्यक्त केलें.

**श्री. मेनन ह्यांच्या कन्येला आलेले अहेर**—हिंदुस्थान सरकारच्या संस्थानी खात्याचे सल्लागार श्री. व्ही. पी. मेनन ह्यांच्या कन्येच्या विवाहप्रसंगीं राजेरजवाड्यांकडून अहेर आलेले होते. श्री. मेनन ह्यांनीं सरकारी नोकरांच्या वर्तणुकीच्या नियमानुसार सदर आहेरांची यादी हिंदुस्थान सरकारला दिली. सर्व अहेरांची मिळून एकूण किंमत १७,५८५ रुपये झाली. अहेरांपैकीं कांहीं जिन्नस श्री. मेनन ह्यांच्या कन्येला देण्यांत आले असून बाकीच्या वस्तू ज्याच्या त्याला परत करण्यासाठीं, हिंदुस्थान सरकारकडे पाठविण्यांत आल्या आहेत, असें कळतें.

**बोटींची वहातुक महागली कां?**—युद्धापूर्वी बोटींतून मालाची ने-आण करण्यासाठी जितका वेळ लागत असे त्यापेक्षा बराच अधिक काळ अलीकडे सर्व जगभरच लागू लागला आहे. १९३९ पेक्षां मालाची वहातूक वाढली असली तरी वहातुकीचा खर्चहि वाढला आहे. खलाशांचे पगार पांचपट वाढले आहेत. त्याचप्रमाणें, गोद्यांतील कामगारांचे पगार व कोळशाची किंमतहि पांचपट वाढली आहे. युद्धापूर्वी बोटी वर्षांतून सरासरी १६८ दिवस गोद्यांत असत आणि १९७ दिवस समुद्रांत प्रवास करीत असत. आतां हें प्रमाण उलटें म्हणजे १४६ दिवस प्रवास आणि २१९ दिवस गोद्यांत असें झालें आहे. बंदरांत पोंचल्यावर माल चढविण्या-उतरविण्यांत होणाऱ्या विलंबाचें मुख्य कारण गोदी-कामगारांचा असंतोष, हें होय.

**दि म्हैसूर किर्लोस्कर लि. च्या भांडवलांत वाढ**—वरील कंपनीची विशेष साधारण सभा २१ मार्च रोजीं भरणार आहे. प्रत्येकी १०० रुपयांच्या १५,००० नव्या शेअर्सच्या स्वरूपांत कंपनीचें अधिकृत भांडवल वाढवून तें २५ लक्ष रु. करण्यांत येईल. तूर्त ५,००० शेअर्स विक्रीस काढण्यांत येतील आणि ते जुन्या भागदारांना प्रथम देऊं केले जातील.

**हिंदुस्थानांत रेडिओंची निर्मिती**—हिंदुस्थानांत बिनतारी दळणवळणाच्या प्रसाराबद्दल चौकशी करण्यासाठी हिंद सरकारनें एक कमिटी नेमली होती. ह्या कमिटीनें आपल्या अहवालांत अशी सूचना केली आहे कीं, ५० हजार स्वस्त किंमतीचे आणि २० हजार भारी किंमतीचे रेडिओ तयार करण्यांत यावे. स्वस्त किंमतीच्या रेडिओंच्या निर्मितींत दरसाल ३५ हजारांची आणि भारी किंमतीच्या रेडिओंत दरसाल ५ हजारांची वाढ करण्यांत यावी, अशी कमिटीची शिफारस आहे. ही शिफारस अमलांत आली तर १९५१ अखेर हिंदुस्थानांत १,५०,००० रेडिओ तयार होऊं लागतील.

**विमान वहातुकीचे नवीन मार्ग**—ता. २२ फेब्रुवारी पासून मद्रास ते विजयवाडा अशी नवीन विमानवहातूक सुरू होणार आहे. त्याशिवाय विजयवाडा मार्गे विझगापट्टम् आणि हैद्राबाद ह्यांना जोडणारा मार्गही ता. १५ फेब्रुवारीपासून सुरू झाला आहे. वहातुकीची व्यवस्था डेक्कन एअरवेज कंपनीकडे आहे. ह्या कामीं उपयोगांत येणारा विजयवाडा येथील गन्नावरम् विमानतळ प्रांतांतील एक मोठा तळ आहे. विमानांना भुईसरपटत जाण्यासाठीं लागणारा तळावरील रस्ता १० फर्लांग लांबीचा आहे.

**दुधाचा पुरवठा वाढविण्याची योजना**—हिंदुस्थानांत डेअरीचा धंदा वाढवून दुधाचा पुरवठा करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक पंचवार्षिक कार्यक्रम आंखला आहे. ह्या योजनेसाठी गंगा नदीच्या दोन्ही कांठच्या प्रदेशांचा विशेष उपयोग होण्यासारखा आहे. चांगल्या दुभत्या जनावरांची पैदास करणें, शहरांतील बेवारशी गुरांची सोय करणें, सहकारी दुग्धालयें काढणें, गवताचा पुरवठा वाढविणें, इत्यादि बाबींचा कार्यक्रमांत समावेश करण्यांत आला आहे.

**१९४८ सालांतील मिठाचें उत्पादन**—हिंदुस्थानांत १९४८ सालीं सर्वांत अधिक मिठाचें उत्पादन झालें. १९४६ सालीं मिठाचें उत्पादन ४८८ लाख मण झालें होतें. १९४७ सालीं ५४० लाख मण झालें आणि १९४८ सालीं ६३७ लाख मण झालें. अनुकूल हवामान आणि मिठागराच्या मालकांना दिलेलें उत्तेजन ह्यांचा हा परिणाम असावा. हिंदुस्थानला दरवर्षी ६७५ लाख मण मीठ लागतें. दरमाणशीं १४ पौंड ह्याप्रमाणें हा हिशोब करण्यांत आला आहे. जगांतील दरमाणशीं मिठाचा खप ३० पौंड आहे. ह्याचा अर्थ, हिंदचें उत्पादन वरील हिशोबाप्रमाणें ६ टक्के कमी पडतें. हिंद सरकारनें प्रांतिक व संस्थानी सरकारांना सूचना देऊन १९४९ सालीं मिठाचें उत्पादन १० टक्क्यांनीं वाढविण्याची सूचना केली आहे.

### पोंच

दि ग्रामोद्योग संवर्धक मंडळ लि., लिंबच्या लोकसेवा मिल्सचें (व्यंकटपुरा, सातारा) १९४९ चें मराठी कॅलेंडर. मिल्समध्यें सर्व प्रकारचें उपयुक्त, टिकाऊ व चांगलें कापड तयार होतें.

# अर्थ

बुधवार, ता. २३ फेब्रुवारी, १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक

( आकडे लक्ष रुपयांचे )

| | दुरुस्त अंदाज १९४८–४९ | अंदाज १९४९–५० |
|---|---|---|
| वहातुकीचें उत्पन्न | २,०४,५० | २,१०,०० |
| व्यवस्था खर्च | १,६८,७१ | १,७२,१२ |
| ( अ ) वाढावा | ३५,७९ | ३७,८८ |
| ( ब ) इतर उत्पन्न | २,२८ | —५,५६ |
| एकूण ( अ ) व ( ब ) | ३८,०७ | ३२,३२ |
| व्याजाचा खर्च | २२,२४ | २२,८८ |
| निव्वळ वाढावा | १५,८३ | ९,४४ |

हिंदुस्थान सरकारचे वहातुक मंत्री, श्री. गोपाल स्वामी अयंगार, ह्यांनीं रेल्वेजचें अंदाजपत्रक गेल्या आठवड्यांत पार्लमेंटास सादर केलें. त्यांतील महत्त्वाचे आकडे वर दिले आहेत. उतारूंच्या किंवा मालाच्या वहातुकीचे दर वाढणार नाहींत, चालू आणि येत्या वर्षी अंदाजपत्रकांत वाढावा दिसत आहे, घसारा फंड मजबूत करण्यांत येत आहे, इत्यादि गोष्टी समाधानकारक असल्या तरी रेल्वेजचा आर्थिक संसार अजून नीटसा मार्गावर लागलेला दिसत नाहीं. वहातुकीच्या मुख्य अडचणींचें कारण हिंदुस्थानाचें इंजनें व बॉयलर ह्यांचे संबंधांतील परावलंबित्व, हें आहे. ३१ मार्च, १९४९ रोजीं १,२९१ इंजनें म्हातारीं होतील. परदेशांतून एकूण ८६३ इंजनें मागविण्यांत आलीं आहेत, त्यांपैकीं फक्त ५२ इंजनें प्रत्यक्ष येऊन दाखल झालीं आहेत. १९४९-५० मध्यें एकूण ५०७ इंजनें येतील अशी अपेक्षा आहे. इंजनांचें हिंदुस्थानांत उत्पादन सुरू करण्याची मागणी हिंदी पुढाऱ्यांनीं किती तरी दीर्घ काळ करीत असतांना, इंग्रज राज्यकर्त्यांनीं तिचेकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलें. चित्तरंजन येथील वर्कशॉपच्या इमारतींचें बांधकाम चालू आहे. तेथें बॉइलर व इंजनें तयार करण्यासाठी विदेशी कारखानदारांकडून तंत्रज्ञ मिळविण्याचा व त्यांचे हाताखालीं हिंदी तंत्रज्ञ तयार करण्याचा प्रयत्न सरकार करणार आहे. हिंदी इंजनें तयार होईपर्यंत विदेशी इंजनें मिळविण्याचे काम चालू ठेवावें लागणार आहे. उतारूंचे व मालाचे डबे बनविण्याच्या बाबतींतहि अशाच प्रकारची परिस्थिति आहे. परंतु कित्येक हिंदी डबे तयार होऊन वहातुकीचें काम करूं लागले आहेत.

---

## व्यापारी हुंड्यांची वाढ व बँकिंगचा धंदा

युनायटेड वेस्टर्न बँक लि. च्या पुणें शाखेच्या स्थलांतराचे प्रसंगीं, ता. ५ फेब्रुवारी रोजीं, बँकेचे चेअरमन श्री. अण्णासाहेब चिरमुले, हे प्रकृतिअस्वास्थामुळें उपस्थित होऊं शकले नाहींत. तथापि, समारंभासाठीं त्यांनीं आपलें भाषण तयार केलें होतें, तें छापून निमंत्रितांना देण्यांत आलें होतें. मालाच्या पोटीं व्यापाऱ्यांनीं काढलेल्या हुंड्यांचें महत्त्व त्यांनीं आपल्या ह्या भाषणांत पुढील प्रमाणें मार्मिकपणें प्रतिपादन केलें होतें:—

" व्यापारी बँकांची बैठक मागणें येईल त्याक्षणीं परत कराव्या लागणाऱ्या ठेवींवर असल्यानें त्यांना निरनिराळ्या उद्योगधंद्याच्या मूलभूत गरजा भागाविणें जड जातें. नव्हे, तें तिचें कार्यक्षेत्रच नव्हे. व्यापारी लोकांच्या दैनंदिन गरजा भागाविणें हेंच त्यांचें सुरक्षित असें कार्यक्षेत्र होय. आपल्याकडे व्यापारी मालाच्या पोटीं काढलेल्या हुंड्या ( ट्रेड बिल्स ) तारण घेऊन त्यावर कर्जाऊ पैसे देणें हें जितकें वाढावयास पाहिजे तितकें वाढलें नाहीं. अशा हुंड्यांच्या मागे या नाहीं त्या प्रकारचा माल असून शिवाय हुंडी काढणारा व ज्याच्यावर हुंडी लिहिली आहे तो अशा दोन प्रकारच्या जामिनक्या अभिप्रेत असतात. यामध्यें हुंडी खरेदिण्यापूर्वी तिच्या पाठीशीं व्यापारी माल आहे किंवा नाहीं याची खात्री करून घेणें खऱ्या बँकरचें नित्याचें असें कार्य आहे. यामुळें सट्टेबाजीस साहजिकच आळा बसला जातो व मालाच्या रूपांत गुंतलेलें भांडवल सुटें होऊन व्यापाऱ्यासही त्याच्या हातांत खेळतें भांडवल राहूं शकतें. इंग्लिश बँका व अमेरिकन बँका अशा हुंड्यांमध्यें बरीच शी रक्कम गुंतवतात व आपला व गिऱ्हाइकांचा असा दोघांचाही फायदा करून घेतात. अशा पद्धतीच्या हुंड्या तारण घेत गेल्यास आपल्या व्यापारास नवीन चालना दिल्यासारखें होईल. "

अशा प्रकारच्या व्यापारी हुंड्यांचा अभाव, ही हिंदी बँकिंगच्या धंद्याच्या प्रगतीच्या व उपयुक्ततेच्या मार्गांतील एक मोठीच अडचण आहे, ह्याविषयीं दुमत नाहीं. पाश्चिमात्य देशांतील बँकांच्या ताळेबंदांत ह्या पतपत्रिकांना फारच महत्त्वाचें स्थान असतें, तसें तें हिंदी बँकांच्या ताळेबंदांत आढळत नाहीं. त्याला अनेक कारणें आहेत, तीं सर्व दूर करणें अर्थातच बँकांच्या हातीं नाहीं. ज्यांत वास्तविक मालाचा कांहींहि व्यवहार नाहीं, परंतु केवळ सावकारी आहे, अशाच प्रकारच्या बऱ्याच हुंड्या जोंपर्यंत बाजारांत खेळतात, तोंपर्यंत बँका त्यांचेकडे साशंकतेनेंच पहाणें क्रमप्राप्तच होतें. शेतकऱ्यांच्या मालाच्या विक्रीचा व्यवहार संघटित बँकिंगच्या धंद्याशीं निगडित करण्याचे प्रयत्न चालू आहेत, त्यांत ज्या प्रमाणांत यश येईल, त्या प्रमाणांत हुंड्यांचा उपयोगहि वाढेल हें उघड आहे.

---

## हिंदी उद्योगधंद्यांची संरक्षणाची मागणी

हिंदुस्थानांतील चलनवृद्धीचें संकोचन करण्यासाठीं आणि चरितार्थाच्या वस्तूंचा तुटवडा कमी करण्यासाठीं, हिंदुस्थान सरकारनें आयात मालाबाबत कांहीं दिवसांपूर्वी अधिक सवलतीचें धोरण स्वीकारलें. परदेशांतून येणाऱ्या मालानें देशांतील बाजारपेठा भरून गेल्या तर येथील उद्योगधंद्यांचें भवितव्य अर्थातच धोक्यांत येणार; कारण, परदेशी मालाशीं टक्कर देण्यासारखा माल अजून हिंदी कारखान्यांत तयार होत नाहीं. ही परिस्थिति ध्यानांत घेऊन हिंदुस्थानांतील ६० उद्योगधंद्यांनीं सरकारकडे आपआपल्या धंद्याला संरक्षण मिळावें म्हणून अर्ज केलेले आहेत. सरकारनें ह्यासंबंधीं असा खुलासा केला आहे कीं, वरील उद्योगधंद्यांपैकीं २० ते २५ उद्योगधंद्यांचीं प्रकरणें टॅरिफ बोर्डाकडे चौकशीसाठीं सोंपविण्यांत आलीं आहेत. सरकारनें स्वीकारलेलें हें धोरण उद्योगधंद्यांच्या वाढीच्या दृष्टीनें योग्य असेंच आहे. परदेशी

आयातीवर एकजात नियंत्रण बसवून देशी उद्योगधंद्यांना एक प्रकारचें कृत्रिम उत्तेजन देणें हें परंपरागत अर्थशास्त्रीय नियमांना धरून नाहीं. आयात-निर्यातीवरील कडक नियंत्रणें हीं संपूर्णतया नियुक्त अर्थव्यवस्थेंत योग्य ठरतील. परंतु तशी व्यवस्था जोंपर्यंत अमलांत आलेली नाहीं, तोंपर्यंत प्रत्येक उद्योगधंद्यानें आपण जगण्यास लायक आहों हें सिद्ध केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. संरक्षण मिळण्यासाठीं आपण पात्र आहों हें पटवून दाखविण्यासाठीं कोणत्याही हिंदी उद्योगधंद्याला पुढील गोष्टी पटवून देतां आल्या पाहिजेत: (१) आपला धंदा योग्य त्या मार्गानें चालला आहे, (२) कांहीं एका योग्य कालानंतर संरक्षणाशिवाय अगर अन्य सरकारी मदतीशिवाय धंदा चालू शकेल आणि (३) राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें धंद्याला संरक्षण मिळणें इष्ट आहे. हिंदुस्थान सरकारनें टॅरिफ बोर्डाकडे ज्या उद्योगधंद्यांचे संरक्षणविषयक अर्ज सोंपविले आहेत त्यांच्या तत्संबंधी योग्यतेचा विचार वरील सर्वसामान्य तत्वें लक्षांत ठेवून केला जाईल आणि नंतर कोठल्या धंद्यासाठीं संरक्षक आयात कर किती प्रमाणांत बसवावा अगर इतर कोणत्या स्वरूपाची मदत द्यावी ह्यासंबंधीं शिफारसी करण्यांत येतील. त्या अखेर स्वीकारणें अगर न स्वीकारणें सरकारच्या हातीं आहे.

---

### हिंदुस्थानांतील साखरेचा धंदा

मुंबई येथें इंडिअन सेंट्रल शुगर केन कमिटीची वार्षिक बैठक नुकतीच झाली. ह्या प्रसंगीं इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचे उपाध्यक्ष सरदार दातारसिंग ह्यांनीं सभेचे अध्यक्ष ह्या नात्यानें हिंदुस्थानांतील साखरेच्या धंद्याविषयीं कांहीं उद्बोधक विचार प्रकट केले. ऊंस हा मूळचा हिंदुस्थानचा रहिवासी; पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं १९३१-३२ सालीं साखरेच्या धंद्याला संरक्षण मिळेपर्यंत हिंदुस्थानला जवळ जवळ सर्व साखर जाव्हा आणि इतर परदेशांतून आयात करावी लागत असे. आजसुद्धां हिंदी साखरेच्या धंद्याला संरक्षक जकातीचा पांगुळगाडा आहेच; इतकेंच नव्हे, तर हा पांगुळगाडा काढून घेतल्यास साखरेचा धंदा टिकून राहणार नाहीं अशी स्थिती आहे. आज जगांतील साखर तयार करणाऱ्या इतर देशांतील साखरेच्या किंमती हिंदुस्थानच्या मानानें पुष्कळच कमी आहेत. परदेशी साखर आज हिंदुस्थानांत येऊं लागली तर हिंदी साखरेच्या धंद्याचा ह्या स्पर्धेपुढें टिकाव लागणार नाहीं, ही गोष्ट सरदार दातारसिंग ह्यांनीं स्पष्ट सांगितली. सध्यां प्रांतिक सरकारांनी ज्या पंचवार्षिक योजना आखल्या आहेत त्या अंमलांत आल्या, म्हणजे दर एकरांगणिक उसाची आणि साखरेची पैदास लक्षांत येण्याइतकी वाढेल, आणि पांच वर्षांच्या अखेरीस दरवर्षी १६ लाख टन साखरेचें उत्पादन करण्याचा पल्ला गाठतां येईल. तथापि, आज ही परिस्थिती नाहीं हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. ऊंस आणि साखर ह्याबाबत आतींपर्यंत जें संशोधन झालें आहे त्यामुळें साखरेच्या धंद्याला सध्याची प्रगति करता आलेली आहे हें खरें. तरीपण दर एकरीं पिकणाऱ्या उसाच्या पिकांत फारशी वाढ झालेली नाहीं. गेल्या पंधरा वर्षांत दर एकरीं १५ ते १५ टन इतकाच ऊंस पिकत आहे. उसाची दर एकरीं निर्मिती वाढविण्यासाठी सर दातारसिंग ह्यांनीं सुचविलेले उपाय सर्वमान्य होण्यासारखेच आहेत. शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीच्या आणि रोगाचा प्रतिकार करूं शकणाऱ्या जातींच्या उसाचें बियाणें पुरविलें गेलें पाहिजे. त्याचप्रमाणें, पुरेशी खतें आणि पाणीपुरवठा ह्यांचीही व्यवस्था करण्यांत आली पाहिजे.

## आमचीं ६० वर्षें

**( अन्योन्य सहाय्यकारी मंडळी लि., बडोद्यांचा हीरक महोत्सव ग्रंथ )**

"यादी बडोदे येथें खाली लिहिलेले मंडळीचा निश्चय जाला आहे कीं दरमाहा दाहा तारीखेचे आंत कमीत कमी दोन रुपयेपेक्षा ज्यास्त सवडीप्रमाणें कांहीं मुकरर रकम दरयेक असामीनें सिलक ठेवावी."

५ फेब्रुवारी, १८८९ रोजीं मंडळीचे प्रवर्तक व संस्थापक श्री. वि. ल. उर्फ भाऊसाहेब कवठेकर ह्यांच्या नेतृत्वाखालीं २३ गृहस्थांनीं बडोदे शहरांतील महाराष्ट्रियांच्या कर्जबाजारीपणावर तोडगा म्हणून 'कवठेकर मंडळी' स्थापन केली, तिच्या पहिल्या ठरावाच्या आरंभींचा भाग वरती उद्धृत केला आहे. वर्गणीच्या योजना १९१२ पर्यंत चालू होत्या. त्या सालीं सहकारी कायद्याखालीं ही मंडळी नोंदण्यांत आली. मंडळीचा प्रधान उद्देशांचा (बचतीची संचय, द्रव्यसंचय, परस्परांस द्रव्यसहाय) आदर्श समोर ठेवूनच मंडळीचा व्यवहार चालू आहे. ३१-७-४८ अखेरच्या हिशेबाप्रमाणें, वर्गणीदार अगर भागदार ४,९६९ असून मासिक बचत रक्कम ८,१७,४६२ रु. आहे. मंडळीचा ताळेबंद ३१ लक्ष रुपयांवर आहे, त्यापैकी भागदारांस व सहकारी मंडळींस १४ लक्ष, ८२ हजार रु. कर्ज दिलेलें आहे. ह्यावरून मंडळीच्या उपयुक्त कार्याची कल्पना येईल. हिंदुस्थान सरकारनें सहकारी कायदा तयार करण्यापूर्वी १५ वर्षांपासून बडोद्याची ही मंडळी मध्यम व श्रमजीवी वर्गाच्या कर्जबाजारीपणाला आळा घालण्याचा यशस्वी प्रयत्न करीत आहे. मंडळी १ मे, १९४९ पासून "हीरक महोत्सव तिजोरी घर" सुरू करणार असल्याचें जाहीर झालें आहे. मंडळीचा हीरक महोत्सव ता. ५ फेब्रुवारी रोजीं मोठ्या थाटानें साजरा झाला, ह्या प्रसंगानें आम्हीं मंडळीचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. हीरक महोत्सव समितीनें महोत्सव ग्रंथ फारच उत्कृष्ट रीतीनें, काळजीपूर्वक तयार केला असून चांगला सजवला आहे आणि महोत्सव साजरा करणाऱ्या संस्थांनीं त्याचा आदर्श ठेवण्याजोगा आहे. अशा प्रकारचा सुबकपणा व निर्दोषपणा तत्सम ग्रंथांत क्वचितच आढळतो.

---

### बँकिंग बिलास हिंदी पार्लमेंटाची मंजुरी

बँकांसाठी स्वतंत्र कायदा असावा, अशी सूचना मध्यवर्ती बँकिंग चौकशी समितीनें १९३० सालीं केली होती. त्यानंतर आतां अठरा वर्षांनीं अशा प्रकारचा स्वतंत्र कायदा होत आहे! युद्धकालीन घडामोडींमुळें बँकिंग बिलाच्या मसुद्यांत फेरफार होत गेले, त्याचप्रमाणें हिंदुस्थान मध्यंतरीं स्वतंत्र झाला त्याचीहि छाया बिलांतील तरतुदींवर पडणें स्वाभाविक होतें. हिंदी बँकिंगची वाढ योग्य मार्गानें व्हावी, अशी तरतूद करण्याचा कायद्याचा उद्देश आहे आणि रिझर्व्ह बँकेस तपासणीचे व्यापक अधिकार देण्यांत आले आहेत. पार्लमेंटानें सुमारें २० तासांच्या चर्चेंत सिलेक्ट कमिटीच्या शिफारशींचा विचार पुरा करून बिलाचें तिसरें वाचन पुरें केलें असून, एका महत्त्वाच्या धंद्याबाबत व्यापक कायदा करून बँकांचें नियंत्रण करण्याची व्यवस्था केली आहे.

---

**कालिंदी नदीवरील धरण**—म्हैसूर आणि मुंबई ह्यांच्या सरहद्दीवर कालिंदी नदीवर धरण बांधण्यासाठी प्राथमिक पहाणी सध्या चालू आहे. हें धरण पुरें झाल्यावर ३,५०,००० किलोवॅटस् विजेचा पुरवठा होईल असा अंदाज आहे. म्हैसूर सरकारशीं वाटाघाटी केल्यानंतर हुबळी आणि त्याच्या आसपासच्या भागाला वीज पुरवठा करण्याचें आश्वासन म्हैसूर सरकारकडून मिळालें आहे. कालिंदी नदीवरील धरण पुरें होऊन वीज-केंद्र उभारलें गेलें, कीं सर्व कर्नाटक भागाला विजेचा पुरवठा होऊं शकेल.

## हिंदी सागवानाचीं बिनतोड जहाजें

'ट्रिंकोमाली' नांवाचें ४६ तोफांचें छोटें लढाऊ जहाज आतां पोर्टस्मथमध्यें ब्रिटिश मुलांना सुट्टीच्या दिवशीं नाविक शिक्षणाचे धडे घावयासाठीं वापरण्यांत यावयाचें आहे. हें जहाज १८१६ सालीं मुंबईस बांधलें गेलें. प्रो. राधाकुमुद मुकर्जी ह्यांनीं आपल्या 'हिस्टरी ऑफ इंडियन शिपिंग' ह्या पुस्तकांत अशी माहिती दिली आहे कीं, सुमारें दोनशें वर्षें हिंदुस्थानांतच बांधलेल्या जहाजांचें 'बॉम्बे मरीन' नांवाचें पराक्रमी आरमार ब्रिटिश सरकारनें बाळगलें होतें. त्या प्रकारच्या कोणत्याहि आरमारास हें आरमार कधींहि हार गेलेलें नाहीं. त्यांतील जहाजें सुरत, मुंबई व कलकत्ता येथें हिंदी लांकडापासून बनवीत असत. हें हिंदी सागवानी लांकूड इंग्लिश 'ओक' लाँकडापेक्षांहि अधिक टिकाऊ असल्याचें सिद्ध झालें आहे. १८०२ सालीं आरमार खात्यानें मुंबईच्या जमशेटजी बोमनजी नांवाच्या नामांकित कारागिराकडून दोन छोटीं व एक मोठें लढाऊ जहाज बांधून घेतल्याचा उल्लेख सांपडतो. ह्या तीन जहाजांमुळें त्यांची सर्वत्र ख्याती झाली. ट्रिंकोमाली हें जहाज ह्या तीन जहाजांपैकींच असण्याचा दाट संभव आहे. वाफेच्या व लोखंडी पत्र्याच्या बोटी बांधण्यास सुरवात झाल्यापासून हिंदी जहाजबांधणीचा हा धंदा मागें पडला. परंतु तत्पूर्वी बांधलेल्या हिंदी जहाजांची मजबुती इतकी होती कीं, त्यापैकीं कित्येक बोटी नुकत्या काल-परवापर्यंत युरोपच्या वायव्य समुद्रविभागांत किनाऱ्यालगतच्या वहातुकीसाठीं वापरल्या जात होत्या. इंग्लंडमधील लांकडी जहाजांचें आयुर्मान सरासरी पंधरा वर्षांचें आहे. ह्यावरून १८१६ सालीं बांधलेल्या ट्रिंकोमाली ह्या जहाजासाठीं वापरलेल्या हिंदी सागवानी लांकडाचा टिकाऊपणा व हिंदी कारागिरांचें मजबूत काम ह्या दोन्ही गोष्टींची जिवंत साक्ष मिळते. हिंदुस्थानचा जहाजबांधणीचा धंदा आतां पुनर्जन्म पावत आहे. अशा वेळीं टिकाऊपणाचे व निर्दोष बांधणीचे केवढे उज्वल आदर्श आपल्याला राखावयाचे आहेत, त्याची कल्पना असणें व्यर्थ ठरणार नाहीं आणि हिंदुस्थानच्या जहाजांना जगांतील सातों समुद्र अनोळखी नाहींत ही गोष्ट आपला आत्मविश्वास जागृत केल्यावाचून राहणार नाहीं.

## ब्रिटनमधील फिल्म्सचें उत्पादन घटलें

१९४८ च्या जूनमध्यें ब्रिटिश सिनेमा-गृहांतून ४५ टक्के फिल्म्स ब्रिटिश बनावटीच्याच दाखविल्या पाहिजेत असा निर्णय घेण्यांत आला. परंतु तेव्हांपासून ब्रिटनमधील फिल्म्सचें उत्पादन वाढण्याऐवजीं घटत चाललें असल्याचें आढळून आलें आहे. तेव्हांपासून अमेरिकन फिल्म कंपन्यांनीं ब्रिटनमध्यें फक्त पांचच चित्रपट तयार केले. ब्रिटिश बोलपटगृहांना ४५ टक्के ब्रिटिश फिल्म्स दाखविण्यास बरीच अडचण भासत आहे. हें प्रमाण राखावयाचें असेल तर फिल्म्स अधिक आठवडे चालविणें, जुन्या चित्रपटांच्या नव्या आवृत्त्या काढणें, इत्यादि उपाय योजावे लागत आहेत. ह्या उपायांमुळें प्रेक्षकांच्या आवडी-निवडींना साहजिकच निर्बंध पडले आहेत. इतकें करूनहि वरील टक्केवारी पाळणें मुष्कीलीचें झालें आहे. बोलपटांच्या तुटवड्यामुळें ब्रिटिश चित्रपटांना मागणी असूनहि ती पुरवितां येत नाहीं. ब्रिटिश बोलपटांच्या निर्मितींत घट होण्याचें मुख्य कारण भांडवलाचा अभाव, हें आहे. चित्रपटांच्या निर्मितीचा सरासरी काळ गेल्या वर्षी १४ आठवडे होता तो आता १२½ आठवड्यांवर आला आहे. चित्रपटांवरील खर्चहि कमी करण्यांत आला आहे. तथापि, ह्या धंद्यांत पैसे गुंतविण्याचें आकर्षण निर्माण होण्यास व्यवसायांत अजूनही सुधारणा झाली पाहिजे, असें तज्ज्ञ म्हणतात.

## सरकारी अधिकाऱ्यांचा अडेलतट्टूपणा

मुंबईच्या फेमस पिक्चर्स लिमिटेड ह्या कंपनीनें 'मोहन' ह्या नांवाचा बोलपट काढण्यासाठीं मेसर्स शामजी कालीदास ॲन्ड कों. ह्या पेढीकडून पांच लाख रुपये कर्ज काढलें व त्याबद्दल सदर बोलपटाचे मालकी हक्क तारण लावून देण्याचा करार केला. हा करार कंपनी कायद्यान्वयें रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे दाखल करण्यासाठीं पाठविला असतां, त्यावर गहाणखताप्रमाणें स्टॅम्प लावावयास पाहिजे, असें वाटून रजिस्ट्रारनें ह्यासंबंधीं निर्णय लावण्यासाठीं कराराचा कागद सुपरिंटेंडेंट ऑफ स्टॅम्प्स् ह्यांजकडे पाठवून दिला. सुपरिंटेंडेंट ह्यांनीं तें गहाणखतच ठरविलें व कंपनीकडून ११,२५० रुपयांच्या स्टॅम्पची मागणी केली. तेव्हां हा प्रश्न हायकोर्टाकडे मतप्रदर्शनार्थ पाठवावा अशी कंपनीनें विनंति केली. ती मान्य झाली नाहीं. तेव्हां कंपनीनें स्वतः हायकोर्टाकडे अर्ज केला. अशाप्रकारें, नागरिकांनीं विनंति केली असतां अधिकाऱ्यांनीं प्रश्न हायकोर्टाकडे पाठविला पाहिजे, असा सर न्यायाधीश व न्यायमूर्ती भगवती ह्यांनीं निर्णय दिला. परंतु सरकारनें ह्याबाबत फेडरल कोर्टाकडे अपील केलें आहे, अशा सबबीवर अधिकाऱ्यांनीं हायकोर्टाचा निर्णय सुद्धां धाब्यावर बसवला. तेव्हां न्यायमूर्ती तेंडोलकर ह्यांनीं चीफ कंट्रोलर रेव्हेन्यू ॲथॉरिटी ह्यांजवर नवा हुकूम बजावून सरकारी अधिकाऱ्यांच्या निष्कारण अडेलतट्टूपणावर सडकून टीका केली. शेवटीं सरकारी वकिलानें, जुना अधिकारी आतां बदलून गेला आहे व नवा अधिकारी हा प्रश्न हायकोर्टाकडे पाठविण्याची व्यवस्था करीत आहे, असा खुलासा हायकोर्टापुढें केल्यावर मग हें प्रकरण तेवढ्यावरच मिटलें.

**कागदाच्या तज्ज्ञाचें आगमन** — फिनलंडच्या परराष्ट्रीय व्यापार संघाचा एक प्रतिनिधी नुकताच हिंदुस्थानांत आला आहे. कागद तयार करण्यासाठीं लागणारा लगदा, कागद आणि प्लायवुडचा धंदा ह्यासंबंधीं तो सल्ला देणार आहे.

**मध्यप्रांतांत औद्योगिक बोर्ड**—मध्यप्रांतांतील उद्योगधंद्यांचे पैशाचे व्यवहार व व्यवस्था पाहण्यासाठीं एक औद्योगिक बोर्ड निर्माण करण्याचें ठरलें आहे. सरकारनें प्रांतांतील अल्युमिनम आणि कोळसा ह्यांच्या खाणी स्वतःच चालविण्याचें ठरविल्यामुळें अशा प्रकारच्या बोर्डाची कार्यक्षमतेच्या दृष्टीनें सरकारला जरूर वाटत आहे. ह्या खाणींच्या धंद्यांत सरकार बऱ्याच मोठ्या रकमा गुंतविणार असून, बोर्ड दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन बरहुकूम काम करणार आहे.


**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

**प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.**

*वर्गणीचे दर :*

**वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.**

**किरकोळ अंक : ४ आ.**

*जाहिरातीचे दर :*

करारच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:—

"अर्थ"

"दुर्गाविलास" पुणें ४.

## १९४८ च्या आर्थिक परिस्थितीचें निरीक्षण.

( मा. म. काळे. )

हिंदच्या १९४८ सालच्या आर्थिक परिस्थितीबद्दल दिल्लीच्या ईस्टर्न एकॉनॉमिस्टनें विशेष प्रकारें स्वतः निरीक्षण केलें आहे. त्या निरीक्षणाचा अगदी थोडक्यांत गोषवारा "अर्था"च्या वाचकांसाठी येथें दिला आहे. आर्थिक परिस्थितीबद्दल निरनिळ्या कल्पना रूढ आहेत, परंतु शास्त्रीय दृष्टीनें विचार करावयाचा झाल्यास येथें दिलेली माहिती बरीच मार्गदर्शक ठरण्यासारखी आहे.

आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतांना उत्पादनाचा प्रथम विचार केला पाहिजे. आपल्या उत्पादनांत शेतीच्या उत्पादनाला स्थान सर्वांत महत्त्वाचें असलें तरी भावी परिस्थितीवर परिणाम करण्याच्या दृष्टीनें शेतीच्या उत्पादनामुळें भांडवल-संचय व नवीन भांडवलाची गुंतवणूक ह्याला मदत होत नसल्यामुळें हें उत्पादन भावी परिणामाच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचें नाहीं असें जरी असलें तरी शेतकरी वर्गाच्या सुस्थितीवर व राहाणीच्या मानावर अर्थव्यवहाराच्या इतर गोष्टी अवलंबून असतात. १९३६ ते १९३९ चें शेतीचें उत्पादन १०० धरल्यास १९४७-४८ सालीं शेतीच्या उत्पादन-वाढीसाठीं 'अधिक धान्य पिकवा' ह्यासारख्या चळवळी करूनहि उत्पादनाचा निदर्शक आंकडा ९७ राहिला. म्हणजे, प्रत्यक्ष उत्पादन घटलें. मध्यंतरीच्या काळांत वस्तूंचे बाजारभाव बरेचसे वाढल्यामुळें शेतकरी वर्गाचें पैशांत उत्पन्न वाढलें असलें, तो वर्ग थोडासा सावरला असला, तरी प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीनें शेतीचें उत्पादन कांहींसें घटलेंच.

उद्योगधंद्यापासूनच्या उत्पन्नाचा विचार करतां असें दिसतें कीं १९३९ सालीं हें उत्पन्न ३७९ कोटी रुपये, १९४४ सालीं १२४० कोटी रुपये व १९४८ सालीं ९८० कोटी रुपये असें झालें. ह्या उत्पादनानें १९४४ सालीं उच्चांक गांठला, पण नंतर तें घटत चाललें. इतर प्रकारचें उत्पादन १९३९ सालीं ६०२ कोटी रुपये, १९४४ सालीं ८६५ कोटी रुपये, १९४८ सालीं ८३२ कोटी रुपये झालें. शेती, उद्योगधंदे व इतर प्रकार ह्या सर्वांचें संकलित आंकडे १९३९, १९४४ व १९४८ सालीं अनुक्रमें १९३४, ४२३३ व ३९४२ कोटी रुपये ह्याप्रमाणें होते. सारांश, युद्धकालांत उत्पादनानें उच्चांक गांठला व नंतर तें हळु हळु घटत गेलें. रुपयामध्यें वरील तीन वर्षांचें अनुक्रमें उत्पन्न वार्षिक दरमाणशीं ६७, १३९ व १६० ह्याप्रमाणें होतें. ह्या दरम्यानच्या काळांत राहाणीचे निदर्शक आंकडे मुंबई शहराच्या आकड्याच्या दृष्टीनें अनुक्रमें १००, २१७ व २५८ असे होते. आतां उत्पन्न व राहाणीचा निदर्शक आंकडा यांचा मेळ घालून वरील तीन वर्षांचा उत्पन्नाचा आकडा अनुक्रमें ६७, ६४, व ६२ असा राहिला. ह्या सर्व आंकड्यांचा संकलित विचार केला असतां प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीनें आर्थिक परिस्थिति खालावत असल्याचें दिसून येतें. खालावलेल्या आर्थिक परिस्थितीच्या मुख्य निदर्शक गोष्टी म्हणजे दरमाणशीं अन्न व कापड ह्यांचा खप ह्या होत. वरील तीन वर्षी दर माणशीं दरवर्षी अन्न ३८८, ३७९, व ३५७ पौंड ह्याप्रमाणें खपलें व कापड १६, १४ व ११ वार ह्या प्रमाणांत खपलें.

वरील काळांत चलनविस्तारामुळें दृश्य पैसा वाढत गेला, परंतु प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीनें परिस्थिति खालावतच चालली. १९४४ पर्यंत उद्योगधंद्यांचें उत्पादन वाढलें व परिस्थिति आटोक्याबाहेर गेली नव्हती. कारण, सहकारी धोरण युद्ध-प्रयत्नांसाठी उत्पादन-वाढीवर भर देणारें होतें. परंतु युद्ध संपल्यानंतरच्या काळांत निरनिराळ्या कारणांमुळें शेती, उद्योगधंदे व इतर प्रकार हें सर्वच उत्पन्न प्रत्यक्ष घटल्यामुळें भांडवलशाही अर्थव्यवस्थेला आवश्यक जें मुख्य अंग म्हणजे भांडवल संचय, शिल्लक टाकण्याची प्रवृत्ति व नवीन भांडवलाची गुंतवणूक, ह्याची पुच्छप्रगति होत गेली व त्यांतनच गेल्या वर्षी पूर्णपणें लक्षांत येणारी आर्थिक दुःस्थिति निर्माण झाली.

आर्थिक जीवनांत मजुरांची उत्पादनशक्ति विचारांत घेणें जरूरीचें असतें. १९३९ सालीं मजुरांची उत्पादनशक्ति १०० समजली तर १९४४ सालीं ती ८३ झाली व १९४८ सालीं ६९ झाली. प्रत्यक्ष पगाराचा वस्तूंच्या रूपांत ह्या तीन वर्षी आंकडा १००, ७४, व ८७ ह्या प्रमाणांत होता. प्रत्यक्ष पगाराला कार्यक्षमतेनें भागिलें असतां येणारा आंकडा वरील तीन वर्षी अनुक्रमें १००, १०८ व १२६ असा आहे. ह्यावरूनहि मजुरांची खरी कार्यक्षमता घटत असल्याचेंच दिसतें. मात्र, त्यांचें पैशांत उत्पन्न वाढत आहे.

मोठमोठ्या कारखान्यांचें उत्पादन १९४४ सालापर्यंत वाढत असलें तरी नंतर उत्पादन कमी होत चाललें आहे व मजुरांचे पगार व इतर गोष्टी ह्यांवरील खर्च वाढत्या प्रमाणांत होत आहे. नफ्याचें प्रमाणहि डिव्हिडंडच्या आंकड्यावरून लक्षांत घेतां घटत चाललें असल्याचें दिसतें. टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचा मजुरीचा खर्च १९४६ सालीं २४·९५ टक्के होता, तो १९४७ २७·२७ टक्के व १९४८ सालीं ३४·५३ टक्के झाला. एकंदर खर्च वजा जातां उद्योगधंद्यांतील नफ्याचें प्रत्यक्ष प्रमाण १९३९ सालीं १०० धरलें तर १९४४ सालीं ९०·६ व १९४६ सालीं ८२·३ इतकें झालें. औद्योगिक परिस्थितीची थोडक्यांत रूपरेषा अशी आहे कीं उत्पादन १९४३, ४४ सालापर्यंत वाढत गेलें व नंतर घटलें. प्रत्यक्ष नफा १९४१, ४२ सालीं सर्वांत जास्त होता व ४३ सालापासून तो हळू हळू घटत चालला आणि प्रत्यक्ष खरें मजुरांचें वेतन १९४२ सालीं वाढलें, ४३ सालीं तें पुन्हा उतरलें, परंतु ४४ पासून किंचित् वाढत गेलें. मजुरांचें एकंदर वेतन वाढत असलें तरी प्रत्येक मजुराचें वैयक्तिक उत्पन्न मजुरांची संख्या वाढल्यामुळें मात्र थोडेसें कमीच होत चाललें आहे.

एकंदर उत्पादनांत शेतीच्या उत्पन्नाचें प्रमाण १९३९-४० सालीं ४९·२ टक्के होतें तर १९४७-४८ सालीं तें ५७·३ टक्के होतें. शेतीच्या उत्पन्नाचें एकंदर उत्पादनांतील वाढतें प्रमाण भांडवल संचय व औद्योगिक विकास ह्या दृष्टीनें निराशाजनक आहे. कारण, उद्योगधंदे व इतर उत्पादन ह्यांतूनच औद्योगिक विकासाला पोषक वातावरण निर्माण होतें व अशा तऱ्हेच्या उत्पन्नाचें प्रमाण १९३९ ते १९४८ ह्या काळांत शेंकडा ८ ह्या प्रमाणांत कमी झालें आहे.

वरील परिस्थितीमुळें १९४६-४७ सालीं निव्वळ शिल्लक २०० कोटी रुपयांनीं कमी झाली. वाढती लोकसंख्या व शिलकीचें कमी प्रमाण ह्यामुळें उद्योगधंद्यांत गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलाचें प्रमाण शेंकडा एकाहूनहि कमी होत चाललें आहे व ह्यांतच सध्यांच्या आर्थिक दुःस्थितीची कारणमीमांसा मुख्यत्वें दिसून येते.

ईस्टर्न एकॉनॉमिस्टनें संशोधनपूर्वक प्रसिद्ध केलेली वरील विचारसरणी विचार करण्यासारखी आहे. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कोलिन क्लार्क ह्यांच्या मतें कोणत्याहि देशाची औद्योगिक परिस्थिति सुस्थितींत रहावयाची असल्यास भांडवल-संचयाचें प्रमाण शेंकडा ६ इतकें असलें पाहिजे. त्या दृष्टीनें हिंदची परिस्थिति फारच असमाधानकारक आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीच्या काळांतहि आपल्या देशांतील भांडवल-संचयाचें प्रमाण शेंकडा एक इतकेंच होतें. गेल्या तीन वर्षांत तर तें जास्तच खाली आलें आहे. वरील सर्व विचारसरणी भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे, एवढें मात्र वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

## प्राप्ती-करासंबंधीं कांहीं ताजे निवाडे

### (१) सूट म्हणजे उत्पन्न नव्हे !

मेसर्स आगरचंद चुनीलाल ह्या पेढीला वायद्याच्या धंद्यांत खोट येऊन मेसर्स गंगाराम आसाराम ह्या पेढीचें सुमारें १,४८,२४२ रुपये देणें झालें होतें. हिशेबाच्या वर्षीच्या आदल्या वर्षी सदर कर्जावर व्याज देऊन करदारांनीं तें आपल्या उत्पन्नांतून वजा घातलें होतें व ते हिशेब प्राप्ती–कर अधिकाऱ्यांनीं मान्य केले होते. हिशेबाच्या वर्षी करदारांनीं सुमारे ५० हजार कर्जफेड केली व मेसर्स गंगाराम आसाराम ह्यांजकडून ५४,२२५ रुपये सूट मिळविली. त्यामुळें पुढील वर्षासाठीं फक्त ४०,००० रुपये कर्ज शिल्लक राहिलें. करदारांना जी सूट मिळाली तेवढें एकप्रकारें त्यांना उत्पन्नच मिळालें व म्हणून त्यावर प्राप्ती–कर द्यावयास पाहिजे असें अधिकारी म्हणूं लागले. तेव्हां त्यांचा हा युक्तिवाद अमान्य करून सुटीची रक्कम ही उत्पन्न समजता येणार नाहीं व तिजवर कर द्यावयास नको, असा नागपूर हायकोर्टानें निर्णय दिला. (ए. आय्. आर. १९४८ नागपूर ४०८)

### (२) एका दुकानांत नफा नि दुसऱ्यांत तोटा

करदार मुरलीधर मथुरावाला ह्यांचीं दोन स्वतंत्र दुकानें होतीं. एक मुंबईस होतें व एक इंदुरला होतें. कर आकारणीच्या वर्षी मुंबई-दुकानाला नफा झालेला होता; परंतु इंदूर-दुकानाला मात्र १,५५,५८३ रुपयांचा तोटा झाला होता. तेव्हां इंदुर-दुकानचा तोटा मुंबई दुकानाच्या नफ्यांतून वजा घालतां येईल काय? असा प्रश्न पडला होता. त्यावर करदार हे हिंदचे रहिवासी आहेत व त्यांना आपल्या सर्व उत्पन्नाचे आंकडे द्यावे लागतात; तेव्हां इंदूर दुकानाचा तोटा त्यांना आपल्या एकूण उत्पन्नांतून वजा घालतां येईल असा निर्णय मुंबई हायकोर्टानें दिला. (ए. आय्. आर. १९४८ मुंबई ४०३)

### (३) डिव्हिडंड जमेची तारीख कोणती ?

करदार लक्ष्मीदास मूळजी ह्यांचें हिशेबाचें वर्ष विक्रमसंवत् होतें. त्यांचे ग्वाटाव मिलमध्यें कांहीं शेअर्स होते. त्यावरील डिव्हिडंड कंपनीनें एका हिशेबी–वर्षांत जाहीर केले; परंतु तें करदारांनीं घेऊन जाण्यासाठीं दिलेली तारीख त्यापुढील हिशेबी–वर्षांत पडत होती. अशावेळीं सदर डिव्हिडंड जाहीर झालेल्या तारखेला मिळालें असें समजावयाचें, कां तें प्रत्यक्ष वसूल होऊन हातीं आलें त्या तारखेस मिळालें असें समजावयाचें? असा प्रश्न पडला होता. कंपनीनें डिव्हिडंड जाहीर करतांच त्याच्या रकमेपुरती कंपनी ही करदारांची ऋणको बनते व म्हणून जाहीर झालेल्या तारखेसच डिव्हिडंड मिळालें, असें धरावयास पाहिजे, असा मुंबई हायकोर्टानें निकाल दिला. (ए. आय्. आर. १९४८ मुंबई ४०५)

---

**ब्रिटिश सैनिकांच्या हिंदी बायका**—हिंदुस्थानांतून ब्रिटिश सैन्य निघून गेल्यावर कांहीं ब्रिटिश सैनिकांच्या हिंदी बायकाही त्यांच्याबरोबर इंग्लंडला गेल्या; परंतु, त्यांच्यापैकीं शेकडों स्त्रिया परत हिंदुस्थानांत येऊं पहात आहेत. त्यांना पुन्हा हिंदी नागरिकत्व पाहिजे आहे. बहुतेक स्त्रिया अँग्लो-इंडिअन असून इंग्लंडमधील जीवनासंबंधीं त्यांच्या अपेक्षांचा भंग झालेला आहे. बहुतेक स्त्रियांना त्यांच्या नवऱ्यांनीं सोडून दिलें आहे अगर घटस्फोट दिला आहे. त्यांच्यापैकीं ज्यांचा प्रवासखर्च हिंदुस्थानांतील त्यांचे नातेवाईक देण्यास तयार आहेत आणि ज्यांनीं आपल्या नवऱ्यापासून स्वतंत्र राहण्याची कायदेशीर मान्यता मिळवलेली आहे, अशांनाच हिंदुस्थान सरकार परत आणीत आहे, असें समजतें.


## कूळ कायदा

आवृत्ति ३ री एका वर्षांत प्रसिद्ध झाली. किं. ३ रु.

| | |
|---|---|
| मुंबई सावकारी कायदा | किं. २॥ रु. |
| नवीन भाडें नियंत्रण कायदा | किं. २ रु. |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | किं. १ रु. |
| हिंदू घटस्फोट कायदा | किं. १ रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा | कापडी किं. ४॥ रु. / कागदी किं. ४ रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनी तयार केलीं आहेत.

पत्ता—लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.



दि

## बँक ऑफ इंडिया, लि.

स्थापना १९०६

खपलेलें भांडवल :– ३,९६,९१,९००.
वसूल झालेलें भांडवल :– १,९८,४५,९५०.
राखीव फंड :– २,४८,४५,९५०.

मुख्य कचेरी :–ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

इतर शाखा :– मुंबईः– बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीकः–वांद्रें व अंधेरी. अहमदाबादः–भद्र (मुख्य शाखा), गांधी रोड, इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ताः– क्लाइव्ह स्ट्रीट (मुख्य शाखा), बडा बाजार व चौरंघी स्क्वेअर. नागपूरः–किंग्ज वे व इतवारी बाजार. पुणेंः– लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :– १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

न्यूयॉर्क एजंट्स :–दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :–सर कासवजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ., के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी.

चालू ठेवीचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु. १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. पकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटींवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें

## आगामी वर्षापुढील कांहीं प्रश्न

### अन्न

दुष्काळाची भुतावळ भेडसावूं लागल्याचें, हातीं येत असलेल्या बातम्यांवरून दिसतें. महाराष्ट्र, गुजरात, मद्रास, म्हैसूर, त्रावणकोर, कोचीनचें अन्नदारिद्र्य नेहमींचेंच आहे ! गुजरातकरितां एक स्वतंत्र सरकारी अधिकारी नेमण्याबाबत सरदार वल्लभभाई पटेल यांनीं मुंबईच्या पंतप्रधानांना सांगितल्याचें वृत्तही प्रसिद्ध झालें आहे.

तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, कडधान्यें, इत्यादि अन्न पदार्थांचें हिंदुस्थानांतील उत्पादन ४ कोटी टन आहे. ३० कोटी जनतेला पोसावयाला आणखी ३०–४० लक्ष टनांची परदेशांतून आयात करावयास पाहिजे. त्याकरितां १००–१२५ कोटी रुपये देण्याची व्यवस्थाही करावयास हवी. दिवसेनुदिवस एवढी रक्कम देणें कठीण होत आहे.

हवा–पाणी, किसान–जमीनदार आदि अनेक कारणांनीं अन्न–पदार्थांचें देशांतील उत्पादन घटत आहे. त्याबरोबरच प्रांतिक सरकारांना, लोकशाही असल्यानें, पूर्वीच्या राजवटीप्रमाणें धान्य-वसुली करतां येत नाहीं हेंही सर्वमान्य सत्य आहे ! धान्य वसुलीशिवाय रेशनिंग यशस्वी कसें होणार ? परदेशी धान्यावर आधारलेलें, रेशनिंग आयात घटली, बोटी वेळेवर आल्या नाहींत म्हणजे कोलमडून पडणार कीं काय अशी केविलवाणी स्थिति होते. पाकिस्तानांत गहूं व तांदूळ यांचीं कोठारेंच गेल्यामुळें परिस्थिति अधिकच बिकट झाली आहे.

धान्य–संपन्न–प्रांत गरजू प्रांतांना धान्य पुरविण्यास विशेष खूष नसतात. त्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन नफेबाजी करण्याचा प्रयत्न ते करतात असें सरदारांनीं बार्डोलींतील भाषणांत सांगितलें.

अशी स्थिति असतांना मला आश्चर्य वाटतें अन्नमंत्री श्री. जयरामदास दौलतराम यांच्या उद्‌गारांचें. नुकत्याच भरलेल्या प्रांतिक व संस्थानी मंत्र्यांच्या परिषदेंत समारोपाच्या भाषणांत ते म्हणाले:—

" आपापल्या प्रांतांतील जनतेला अन्न पुरविण्याची व्यवस्था प्रांतिय सरकारांनीं करावी. अन्न–आयातीच्या जबाबदारींतून मध्यवर्ती सरकाराला मोकळें करण्याची वेळ आतां आली आहे. "

परदेशी अन्न–पदार्थांकरितां उभा करावा लागणारा पैसा–डॉलर्सबाबतच्या मध्यवर्ति सरकारच्या अडचणी मान्य आहेत. प्रांतिक सरकारांनीं स्वयंपूर्ण होण्याचे अधिक प्रयत्न करावेत हेंही मान्य. तथापि जनतेला अन्न पुरविण्याची प्राथमिक व महत्त्वाची जबाबदारी मध्यवर्ति सरकार टाळूं कशी शकेल ?

हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या परिषदेबरोबरच शेतकी विषयक शास्त्रज्ञांची दक्षिण हैद्राबादमध्यें गेल्या डिसेंबरमध्यें परिषद भरली होती. " अन्न–पदार्थांच्या उत्पादनाचे आव्हानाचा स्वीकार आपण करूं शकतो. जागतिक युद्धाबाबत आपल्याहून फारशा अधिक उत्सुक नसलेल्या ब्रह्मदेश, सयाम व पाकिस्तान या देशांशीं व्यापारी करार करून चालूं तूट भरून काढतां येईल. नैसर्गिक साधनांच्या सहाय्यानें व आपल्या प्रयत्नांनीं परिस्थितींत सुधारणा निश्चितपणानें घडवून आणता येईल " असा आशावाद आपल्या अध्यक्षीय भाषणांत सर एस्. व्ही. राममूर्ति यांनीं व्यक्त केला.

आशावाद व वास्तवता यांतील अंतर प्रयत्नवादानेंच कमी होतें ना ?

—संजय

**मुंबई प्रांताचें विक्री-कराचें उत्पन्न**—चालू फडणिशी वर्षांत मुंबई प्रांताला विक्री-करापासून ६ कोटी रुपयांचें उत्पन्न होईल असा अंदाज आहे. गेल्या वर्षी ह्या कराचें उत्पन्न ४ कोटी रुपये झालें होतें. कर गोळा करण्याची अधिक कडक व्यवस्था केल्यामुळें आणि कांहीं चैनीच्या वस्तूंवरील कर गेल्या वर्षापासून रुपयामागें १ आणा केल्यामुळें ही वाढ झाली असावी.

**ब्रिटिश बोलपट धंद्यावर आर्थिक संकट**—ब्रिटनमधील बोलपट निर्माण करणाऱ्या कंपन्या आर्थिक अडचणींत सांपडल्या आहेत. त्यामुळें नटनटींपासून तो फाटकावरील भय्यापर्यंत सुमारें १२,००० लोकांवर बेकारीचें संकट ओढवलें आहे. कांहीं मोठ्या प्रथितयश नटांचे पगार एकदम कमी होण्याचा संभव आहे. कांहीं दिवसांपूर्वीं ८ प्रमुख बोलपट निर्मात्यांनीं ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष, मि. हॅरोल्ड विल्सन ह्यांची गांठ घेऊन त्यांना असें सांगितलें कीं, ह्या धंद्याकडून दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या ४ कोटी पौंड करमणुकीवरील करापैकीं निमी रक्कम परत दिली गेली तरच धंद्यावरील संकट टळेल. सर विल्सन ह्यांना हा मार्ग पटला तर सर्वच प्रश्न त्यांना ब्रिटनच्या प्रधानमंडळापुढें ठेवावा लागेल. दरम्यान, सरकारतर्फें नॅशनल फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशन ह्या संस्थेकडून छोट्या धंदेवाल्यांना ५ वर्षांत १० लाख पौंड कर्ज देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.




**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,१०,००० |
| एकुण खेळतें भांडवल | रु. दोन कोटींचे वर |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. धों. कृ. साठे ( चेअरमन ), श्री. श्री. गो. मराठे ( व्हाइस चेअरमन ), श्री. न. ग. पवार, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. भा. म. गुप्ते, श्री. मो. रा. ढमढेरे.

★ चालू खात्यावर द. सा. द. शें. अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
★ सेव्हिंग्ज खात्यावर द. सा. द. शें. १॥ टक्का व्याज मिळतें.
★ मुदती ठेवींची रक्कम तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत स्वीकारली जाते.
★ सोलापूर येथें सेफ डिपॉसिट व्हॉल्टची व्यवस्था केली आहे.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २ } सी. व्ही. जोग, मॅनेजर.

( पॅरेमाउंट लि. )

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.